



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

समर्थ **गांवकरी**

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

सोमवार दि. २६ जानेवारी २०२६






मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०६८ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


## भक्तीचा सुगंध पसरवत महाराष्ट्राच्या ५९व्या निरंकारी संत समागमात एकवटला लाखोंचा जनसमूह

# ईश्वराला जाणून त्याच्या सतत जाणीवेतून आत्ममंथन शक्य आहे : निरंकारी सतगुरू माता सुदीक्षाजी महाराज


































**सांगली : (समर्थ गांवकरी)**

ईश्वर सर्वव्यापी आहे, सृष्टीच्या कणा-कणा मध्ये तो विराजमान आहे. याला अंगसंग पाहून सदैव त्याच्या जाणीवेत जीवन जगल्यानेच आत्ममंथन व आंतरिक यात्रा शक्य आहे. वरील उद्गार निरंकारी सतगुरू माता सुदीक्षाजी महाराज यांनी महाराष्ट्राच्या ५९व्या संत समागमाच्या प्रथम दिवशी २४ जानेवारी, २०२६ रोजी उपस्थित श्रद्धाळूंच्या विशाल जनसमुदायाला संबोधित करताना व्यक्त केले.

सांगली ईश्वरपूर रोडलगत जवळपास ३५० एकरच्या विशाल मैदानात आयोजित या तीन दिवसीय समागमामध्ये महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यातून तसेच देशाच्या विविध प्रांतातून लाखोंच्या संख्येने श्रद्धाळू भक्तगण व प्रभूप्रेमी सज्जन सहभागी झाले आहेत.

सतगुरू माताजी म्हणाल्या, की भक्ती आपण स्वतःमध्ये सुधारणा करण्याचे नाव आहे. मनाला निर्मळ करून जीवनाला सुंदर बनवत मानवतेच्या मार्गावर चालून सहज जीवन जगायचे आहे. साधु-संतांनी निरंतर इतरांचे अवगुण न पाहता स्वतःमध्ये सुधारणा करण्याची शिकवण दिली आहे. नम्रता व सहनशीलता यांसारख्या दिव्य गुणांना धारण करून आपले जीवन उज्वल करायचे आहे. सतगुरू माताजींनी पुढे सांगितले, की जीवनात जेव्हा ब्रह्मज्ञानाचा प्रकाश येतो, तेव्हा भक्ताला इतरांच्या वेदनांची जाणीव होऊ लागते. त्याच्या अंतरमनात दया व करूणेचा भाव उत्पन्न होतो.

ज्याप्रमाणे स्वतःच्या जीवनाचे कल्याण झाले आहे, तद्वत इतरांच्या जीवनातही या ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करण्याचा प्रयत्न तो अत्यंत उदार व नम्र भावनेने करतो. असे संतजन स्वतः ज्ञानाच्या आधारे जीवन जगून हा दैवी संदेश सर्वांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य करतात.

शेवटी सतगुरू माताजी म्हणाल्या, की आत्ममंथन हा हृदयापासून विचार करण्याचा विषय आहे शुष्क बौद्धीक तर्क-वितर्काचा विषय नाही. परमात्म्याने या सुंदर जगाची रचना केली आहे. जर आपण या जगात आलो आहोत, तर मनातील विपरीत भावनांना दूर करत मानवतेच्या भावनेने युक्त होऊन जीवन जगायचे आहे. त्याचबरोबर जे बाह्यरूपी प्रदूषण आहे, त्याला देखील दूर करणे आपले कर्तव्य आहे ज्यायोगे या जगताची सुंदरता कायमस्वरूपी टिकेल. सत्संग कार्यक्रमामध्ये देश-विदेशातून आलेल्या विद्वान वक्ता महात्म्यांनी विविध भाषांचा आधार घेत विचार, भक्ती रचना, कविता व विविध प्रस्तुतींच्या माध्यमातून आपले भाव व्यक्त केले. समागम समितीचे समन्वयक आदरणीय नंदकुमार झांबरे यांनी या कार्यक्रमाच्या मुख्य उद्देशाला अधोरेखित करत आपले भाव प्रकट केले.

### सेवादल रॅली

समागमाच्या दुसऱ्या दिवसाची सुरूवात एका आकर्षक सेवादल रॅलीने झाली ज्यामध्ये महाराष्ट्रासह अन्य ठिकाणांहून आलेल्या हजारो सेवादल बंधु-भगिनी आपआपली खाकी-निळी वर्दी परिधान करून सहभागी झाले होते. विदेशातील सेवादल सदस्यांनी देखील त्यांच्या विशिष्ट गणवेषामध्ये या रॅलीमध्ये भाग घेतला. सतगुरू माताजी व निरंकारी राजपिताजींचे रॅलीमध्ये आगमन होताच मंडळाच्या सेवादल आधिकाऱ्यांनी पुष्पगुच्छ देऊन या दिव्य युगुलाचे सहर्ष स्वागत केले.

सेवादल रॅलीला आरंभ केल्यानंतर सतगुरू माता सुदीक्षाजी महाराज यांनी आपल्या करकमलाद्वारे शांतीचे प्रतीक असणारा मिशनचा श्वेत ध्वज फ़डकवला. या रॅलीमध्ये बँण्डच्या सूरात पी.टी. परेड, संगीतमय योगा, मानवी पिरॅमिड, मल्लखांब, रोबिक, अम्ब्रेला फॉर्मेशन तसेच अनेक विविध खेळ व साहसी प्रकार प्रस्तुत केले.

त्याचबरोबर मिशनच्या शिकवणीवर आधारित विविध भाषांच्या माध्यमातून लघु नाटिका सादर करण्यात आल्या ज्याद्वारे भक्तीमधील सेवेचे महत्व अधोरेखित केले गेले तसेच अहंकार रहित होणे, सेवेमधील चेतनता व आदर भाव इत्यादी दिव्य गुण धारण करण्याची प्रेरणा देण्यात आली. सेवादल व श्रद्धाळू भक्तगणांना संबोधित करताना सतगुरू माता सुदीक्षाजी महाराजांनी प्रतिपादन केले, की जीवनात निराकार परमात्म्याला प्राथमिकता देत समर्पित भावनेने सेवा करायची आहे. सेवा केवळ एक कार्य नसून ते पूर्ण मनोभावे श्रद्धा व सत्कार भावनेने करायची साधना आहे. सेवेच्या सोबत जीवनात सत्संगला महत्व देणे सुद्धा सेवेचेच एक रूप आहे. सेवेच्या मूळ भावनेला समजून केले गेलेले कार्यच जीवनामध्ये सुधारणा घडवते.

### निरंकारी मिशनच्या नूतन साहित्याचे प्रकाशनः

समागमाच्या पहिल्या दिवशी सत्संग कार्यक्रमा दरम्यान सतगुरू माता सुदीक्षाजी महाराज यांच्या करकमला द्वारे समागम विशेषांक आत्ममंथन आणि 'गुरूदेव हरदेव' या पुस्तकाची नुतन भाषांतर आवृत्ती तसेच अन्य पुस्तकांच्या भाषांतर आवृत्तींचे प्रकाशन करण्यात आले. ही सर्व प्रकाशन सामग्री व मिशनच्या पत्र-पत्रिका समागम मध्ये लावलेल्या प्रकाशनाच्या स्टॉल्सवर अत्यंत माफ़क दरात उपलब्ध आहेत ज्याचा लाभ श्रद्धाळू भक्तगण मोठ्या उत्साहाने घेत आहेत.

### लंगर व कॅंटीन व्यवस्था

समागमात येणाऱ्या सर्व श्रद्धाळूंसाठी दिवस-रात्र सामूहिक भोजनाची (लंगर) व्यवस्था मैदानाच्या तिन्ही भागांमध्ये केली आहे. या व्यतिरिक्त चार कॅंटीनची



व्यवस्था करण्यात आली आहे ज्यामध्ये अत्यल्प दरात चहा, कॉफी, शीत पेये व अल्प-उपहार उपलब्ध आहेत. मिनरल वॉटरची देखील उचित व्यवस्था याच कॅन्टीन्समध्ये करण्यात आली आहे.

# सोनिया गांधी पॉलिटेक्निकमध्ये १६ वा राष्ट्रीय मतदार दिन उत्साहात साजरा





**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

सोनिया गांधी पॉलिटेक्निक कॉलेज, श्रीगोंदा येथे दि. २३ जानेवारी रोजी १६ वा राष्ट्रीय मतदार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्रीगोंदा पोलीस निरीक्षक किरण शिंदे व तहसीलदार सचिन डोंगरे उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य अमोल नागवडे व संस्थेचे निरीक्षक सुरेश गोलांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांनी तरुणांनी मतदान प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. मतदानाचा दिवस हा केवळ सुट्टीचा दिवस नसून लोकशाहीतील आपले कर्तव्य पार पाडण्याचा दिवस असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मतदानाबाबत जनजागृती व लोकशाहीचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठीच राष्ट्रीय मतदार दिन साजरा केला जातो, असेही त्यांनी नमूद केले.

तहसीलदार सचिन डोंगरे यांनी आपल्या भाषणात देशातील पहिली सार्वत्रिक निवडणूक १९५२ साली झाल्याचा उल्लेख केला. जशी प्रजा तसाच लोकप्रतिनिधी या तत्त्वावर लोकशाही उभी असून लोकांनी लोकांसाठी चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही असल्याचे त्यांनी सांगितले. मतदान हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क असून प्रत्येक मत अमूल्य असल्याचे त्यांनी नमूद केले. कोणत्याही आमिषाला बळी न पडता योग्य उमेदवाराला मतदान करण्याचे आवाहनही त्यांनी केले. यानंतर उपस्थितांकडून सामूहिक मतदार प्रतिज्ञा घेण्यात आली. वंदे म ातरम् गीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पंडित गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन अनारसे यांनी केले तर आभार प्रदर्शन विलास शिंदे यांनी केले. या कार्यक्रमास पत्रकार, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागवडे कारखान्याच्या व्हा. चेअरमनपदी सौ. मेघा औटी यांची निवड

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याच्या रिक्त असलेल्या व्हाईस चेअरमन पदावर सौ. मेघा संदीपराव औटी यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या पार्श्वभूमीवर तसेच नागवडे कारखान्याच्या इतिहासात प्रथमच एका महिलेला व्हाईस चेअरमनपदी संधी दिल्याबद्दल कारखान्याचे चेअरमन राजेंद्र दादा नागवडे व संचालक मंडळाचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

व्हाईस चेअरमन पदाच्या निवडीसाठी शुक्रवार, दि. २३ रोजी सकाळी ११ वाजता कारखान्याच्या अतिथीगृहातील सभागृहात संचालक मंडळाची विशेष सभा पार पडली. या सभेच्या अध्यक्षस्थानी संजय गोंदे, अध्यासी अधिकारी तथा प्रादेशिक उपसंचालक (साखर), अहिल्यानगर हे होते. प्रारंभी त्यांनी निवडणूक प्रक्रियेची माहिती दिली. त्यानंतर संचालिका सौ. मंदाकिनी मारुती पाचपुते यांनी सौ. मेघा औटी यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला, तर संचालक सावता लक्ष्मण हिरवे यांनी त्यास अनुमोदन दिले. यानंतर उपस्थित संचालकांनी एकमताने निवडीवर शिक्कामोर्तब केले.

यावेळी बोलताना कारखान्याचे चेअरमन राजेंद्र दादा नागवडे म्हणाले की, केंद्र शासनाने चालू वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून जाहीर केले असून कारखान्याचा ऐतिहासिक ५१ वा गळीत हंगाम सुरू आहे. या पार्श्वभूमीवर



महिलांना नेतृत्वाची संधी देण्याच्या उद्देशाने सर्व संचालकांनी सौ. मेघा औटी यांच्या नावास एकमताने मान्यता दिली. कारखान्याच्या इतिहासात प्रथमच एका सक्षम महिलेला व्हाईस चेअरमनपदी काम करण्याची संधी मिळाल्याचा विशेष आनंद असल्याचे त्यांनी नमूद केले.

सौ. मेघा औटी या गेल्या पंधरा वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत असून वेळू गावच्या सरपंचपदाची जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे पार पाडली आहे. स्व. बापूंच्या विचारप्रेरणेतून सुरू असलेली कारखान्याची यशस्वी वाटचाल भविष्यातही अधिक बळकट होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

या सभेस कारखान्याचे सर्व संचालक, कार्यकारी संचालक प्रवीण शिंदे, कार्यकर्ते, सभासद तसेच खातेप्रमुख उपस्थित होते. सौ. मेघा औटी यांच्या निवडीबद्दल कारखान्याचे चेअरमन राजेंद्र दादा नागवडे, सर्व संचालक मंडळ, जिल्हा सहकारी बँकेच्या संचालिका सौ. अनुराधाताई नागवडे, तालुका दूध संघाचे चेअरमन दिलीप वागस्कर यांच्यासह विविध मान्यवरांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.



# मार्च अखेर शंभर टक्के निधी खर्च करून गुणवत्तापूर्ण कामे करा : पालकमंत्री डॉ राधाकृष्ण विखे पाटील

- शासकीय विभागांनी स्थानिक लोकप्रतिनिधींशी समन्वय राखावा
- जिल्हा वार्षिक योजनेच्या ७५६ कोटी ४३ लक्ष रुपयांच्या प्रारूप आराखड्यास मान्यता
- शौर्य स्तंभा'साठी ५ कोटींची तरतूद पासपोर्ट कार्यालयाच्या अद्ययावत नूतनीकरणासाठी १ कोटी रुपयांचा निधी
- जिल्हास्तरीय गणित-विज्ञान प्रदर्शनाचे ५ लाखांचे अनुदान वाढवून थेट १ कोटी रुपये

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजनेच्या ७५६ कोटी ४३ लक्ष रुपयांच्या प्रारूप आराखड्यास मान्यता देण्यात आली असून, मार्च अखेरपर्यंत प्राप्त होणारा संपूर्ण निधी १०० टक्के खर्च करून गुणवत्तापूर्ण कामे करावेत. प्रशासकीय विभागांनी विकास प्रस्ताव तयार करताना स्थानिक लोकप्रतिनिधींशी योग्य समन्वय ठेवावा. अशा सूचना जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या बैठकीला विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीला आमदार किशोर दराडे, आ.सत्यजित तांबे, आ.मोनिकाताई राजळे, आमदार किरण लहामटे, आ. काशिनाथ दाते, आमदार विठ्ठलराव लंघे, आमदार आशुतोष काळे, आमदार अमोल खताळ, आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्यासह जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर व विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत सन २०२५-२६ या चालू आर्थिक वर्षातील जिल्हा वार्षिक योजनेचा आढावा घेण्यात आला. या वर्षासाठी जिल्ह्याकरिता एकूण १०२७ कोटी ३१ लक्ष रुपये नियतव्यय मंजूर असून, त्यापैकी ८०१ कोटी ३७ लक्ष रुपये किमतीच्या कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. शासनाकडून प्राप्त ५६९ कोटी ९० लक्ष निधीपैकी २२८ कोटी १२ लक्ष रुपये कार्यान्वयीन यंत्रणांना वितरीत करण्यात आले आहेत. निधी व्यपगत होणार नाही याची दक्षता घेऊन मंजूर आराखड्यानुसार ३१ मार्चपूर्वी १०० टक्के प्रशासकीय मान्यता देण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी नियोजन विभागाला केल्या. चालू आर्थिक वर्षात जिल्हा परिषदेकडील विविध योजनांसाठी २५४ कोटी २७ लक्ष रुपये, तर नगरपालिका व नगरपंचायतींमधील योजनांसाठी ७६ कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

श्री.विखे पाटील म्हणाले, जिल्ह्यातील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण व्हावी व वैज्ञानिक दृष्टिकोन रुजावा, यासाठी जिल्हा विज्ञान प्रदर्शनासाठीची तरतूद ५ लाखांवरून १ कोटी रुपये करण्यात आली आहे. या निधीतून प्रदर्शनासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवास व भोजनाची व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच छत्रपती संभाजीनगरच्या धर्तीवर जिल्ह्यात अद्ययावत 'हायटेक सायन्स सेंटर' उभारण्यासाठी आराखडा तयार करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी व शिक्षण विभागाला देण्यात आल्या. वन विभागाच्या बळकटीकरणासाठी मंजूर ९ कोटी निधीतून नाईट व्हिजन दुर्बिणी, थर्मल ड्रोन्स व वाहनांची उपलब्धता झाली असून, बिबट्या रेस्क्यू सेंटरचा सविस्तर प्रस्ताव शासनास त्वरित सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

रस्ते विकासाचा आढावा घेताना पालकमंत्र्यांनी केवळ रस्त्यांची लांबी न वाढवता गुणवत्तेवर भर देण्याची सूचना केली. रस्त्यांचा दर्जा निकृष्ट आढळल्यास संबंधित कंत्राटदारांचे देयक थांबवून काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करावी, तसेच रस्त्यांच्या कामासाठी पुणे जिल्ह्याच्या धर्तीवर तांत्रिक निकषांचा वापर करावा, असे आदेश देण्यात आले. नोव्हेंबर २०२५ मध्ये १०० वर्षे पूर्ण होणाऱ्या भंडारदरा धरणाच्या शताब्दी महोत्सवासाठी व तेथील ब्रिटीशकालीन विश्रामगृह व उद्यानाच्या नूतनीकरणासाठी पर्यटन विभागाकडे सादर केलेल्या ६८ कोटींच्या प्रस्तावाचा मंत्रिमंडळ स्तरावर पाठपुरावा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर कोपरगाव व संगमनेर येथील भाविकांच्या सोयीसुविधांसाठी कुंभमेळा निधीतून तरतूद करण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी व अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस प्रशासनाने कठोर भूमिका घ्यावी, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले. संगमनेर, राहाता व प्रवरा लोणी परिसरात गुटखा, एमडी ड्रग्ज व अवैध कत्तलखाने सुरू असल्याच्या तक्रारींची गंभीर दखल घेत, यापुढे अशा तक्रारी आल्यास संबंधित पोलीस अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई केली जाईल, असेही पालकमंत्र्यांनी सांगितले.

अवैध वाळू वाहतूक व काळ्या काचा लावून फिरणाऱ्या वाहनांवर भेदभाव न करता कडक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. कामगार विभागाच्या योजना राबवताना पारदर्शकता ठेवावी, एजंटगिरीला थारा न देता स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन शिबिरांचे आयोजन करावे व अनियमितता आढळल्यास गुन्हे दाखल करण्याचे आदेशही देण्यात आले.

कोपरगाव क्षेत्रातील महामार्गावरील अपघातांचे प्रमाण लक्षात घेऊन कोपरगाव ग्रामीण रुग्णालयासाठी 'डव्हान्स लाईफ सपोर्ट' रुग्णवाहिका मंजूर करण्याचे निर्देश देण्यात आले. वीज बिल मुक्त ग्रामपंचायत अभियानांतर्गत शासकीय इमारतींवर सौर ऊर्जा प्रकल्प प्रभावीपणे राबविण्याबाबत सूचना करण्यात आल्या. जिल्हा परिषद शाळांमधील मुलींच्या स्वच्छतागृहांची केवळ बांधकाम न करता पाण्याची सोय असलेले मॉडेल तयार करण्याचे व कामे अर्धवट सोडणाऱ्या कंत्राटदारांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिले. श्रीगोंदा येथील उपजिल्हा रुग्णालयाची इमारत पूर्ण असूनही पदनिर्मितीअभावी रखडलेले हस्तांतरण तातडीने पूर्ण करून तेथे बाह्य रुग्ण विभाग सुरू करण्याचे निर्देश आरोग्य विभागाला देण्यात आले. तसेच जिल्ह्यातील शाळा खोल्यांच्या कमतरतेबाबत शिक्षण विभागाने सर्वेक्षण करून सर्वकष आराखडा सादर करावा, अशी सूचना सदस्यांनी मांडली.

जिल्ह्यातील औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारच्या धोरणानुसार कोपरगाव, राहाता, शिर्डी व संगमनेर या पट्ट्यात 'डिफेन्स क्लस्टर' उभारण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. एमआयडीसीसाठी आवश्यक भूसंपादन प्रक्रिया गतिमान करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी 'एक खिडकी योजना' प्रभावीपणे राबवावी. जिल्ह्याला प्राप्त झालेल्या सुमारे १ हजार १०० कोटी रुपये विकासनिधीचे नियोजनबद्ध वितरण व विनियोग सुनिश्चित करण्यात यावा. रस्ते सुरक्षेच्या अनुषंगाने महामार्गावरील अपघाती स्थळांचे सर्वेक्षण करून तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. उपप्रादेशिक परिवहन विभागाने कागदपत्रांच्या तांत्रिक तपासणीपेक्षा प्रत्यक्ष वाहतूक नियमनावर भर द्यावा, फिटनेस नसलेल्या व नियमबाह्य लक्झरी बसेसवर कडक कारवाई करावी, मात्र शेतकऱ्यांच्या शेती उपयोगी वाहनांची अनावश्यक अडवणूक टाळावी, असे निर्देश देण्यात आले.

बैठकीच्या सुरुवातीस माजी राज्यमंत्री स्वर्गीय शिवाजीराव कर्डिल यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. शिर्डी एमआयडीसीतील 'निबे' उद्योग समूहाने संरक्षण साहित्याच्या निर्मितीत केलेल्या कामगिरीबद्दल व प्रजासत्ताक दिनाच्या संचलनातील सहभागाबद्दल सभागृहाने अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यात आला. संगमनेरचे ज्येष्ठ कलावंत रघुवीर खेडकर यांना 'पद्मश्री' पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यात आला. या बैठकीत उपस्थितांना बाल विवाह मुक्त अभियानाची शपथ देण्यात आली.

बैठकीतील महत्त्वाचे निर्णय

- 'शौर्य स्तंभा'साठी ५ कोटींची तरतूद : श्रीगोंदा तालुक्यातील पेडगाव येथील 'धर्मवीर गडावर' छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मृतीप्रीत्यर्थ भव्य 'शौर्य स्तंभ' उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी ५ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

- पासपोर्ट कार्यालय नूतनीकरण : अहिल्यानगर येथील पासपोर्ट कार्यालयाच्या अद्ययावत नूतनीकरणासाठी १ कोटी रुपयांचा निधी देण्यात येत आहे.

- गणित - विज्ञान प्रदर्शन : जिल्हा परिषदेचे विद्यार्थी विज्ञानात उत्तम प्रगती करत आहेत. त्यांच्या गुणवत्तेला वाव देण्यासाठी, जिल्हास्तरीय गणित-विज्ञान प्रदर्शनाचे ५ लाखांचे अनुदान वाढवून थेट १ कोटी रुपये करण्यात आले आहे. गरज भासल्यास यासाठी आणखी निधी उपलब्ध करून दिला जाईल.

- जिल्हा नियोजन समितीच्या आजच्या बैठकीत अकोले तालुक्यातील धुमाळवाडी येथील श्री. सोमेश्वर महादेव मंदिर देवस्थान, संगमनेर तालुक्यातील धांदरफळ बु. येथील श्री. विठोबा देव मंदिर देवस्थान व खळी येथील श्री. खंडोबा मंदिर देवस्थान, तसेच कोपरगाव तालुक्यातील देर्डे चांदवड येथील श्री. मारुती मंदिर देवस्थान अशा एकूण चार ग्रामीण तीर्थक्षेत्रांना 'क' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्यात आला आहे. यासोबतच, कोपरगाव तालुक्यातील मौजे संवत्सर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र मौजे शिंगणापूर येथे स्थलांतरीत करण्याच्या प्रस्तावासही या बैठकीत मंजूरी देण्यात आली.

- आगामी वर्षाचा आराखडा (२०२६-२७) : आगामी २०२६-२७ या वर्षासाठी ७५६ कोटी रुपयांच्या प्रारूप आराखड्यास मंजुरी देण्यात आली आहे. मागील वर्षी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सहकार्यामुळे आपल्याला ८३० कोटी रुपये मिळाले होते. त्याच धर्तीवर, यंदा हा निधी वाढवून १ हजार कोटी रुपयांपर्यंत मिळावा, यासाठी विशेष प्रयत्न केले जातील.

# महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात 'करिअर डे' उत्साहात साजरा

श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)

महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय व कर्मवीर विद्याप्रबोधिनी, रयत शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात 'करिअर डे' उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात राष्ट्रीय सुवर्णपदक विजेते व कृषी तंत्रज्ञ मा. श्री. रमेशजी हिरवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

मार्गदर्शन करताना श्री. हिरवे यांनी कृषी क्षेत्रातील विविध व्यावसायिक संधींचे सविस्तर विवेचन केले. सेंद्रिय शेती, सेंद्रिय उत्पादनांची निर्मिती, कृषी पॅकेजिंग व मार्केटिंग, मार्केटिंग नेटवर्किंग, सेंद्रिय गुळापासून चॉकलेट निर्मिती, नाचणीच्या भाकरीसारखी मूल्यवर्धित उत्पादने तसेच कृषी-आधारित स्टार्टअप कसे सुरू करावेत, याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यासोबतच विविध शासकीय योजनांचा लाभ कसा घ्यावा व शासकीय मदतीच्या माध्यमातून स्वतःचा व्यवसाय कसा उभारता येईल, याची सखोल माहितीही त्यांनी दिली.

फक्त नोकरीच्या मागे न लागता कोणत्याही शाखेचा पदवीधर कृषी व्यवसायाच्या माध्यमातून यशस्वी उद्योजक बनू शकतो. रोजगार शोधणारे नव्हे, तर रोजगार निर्माण करणारे व्हा, असा मौलिक सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य मा. डॉ. प्रकाश साळवे होते. त्यांनी विद्यार्थ्यांनी कृषी व्यवसायात स्वतःचे स्थान निर्माण करून नवउद्योजक म्हणून पुढे यावे, असे आवाहन केले. तसेच 'शाळा तेथे कौन्सेलर' हा उपक्रम राबवणाऱ्या कर्मवीर विद्याप्रबोधिनीचे आभार व्यक्त केले.



कार्यक्रमासाठी पाहुण्यांचे स्वागत मा. डॉ. प्रकाश साळवे यांनी केले. नोकरीपेक्षा व्यवसायाकडे विद्यार्थ्यांचा कल वाढावा व त्यांना उद्योजकतेची दिशा मिळावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा 'करिअर डे' कृषी क्षेत्राच्या कमळाने गुंफलेले पहिले पुष्प ठरल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

कार्यक्रमाची प्रस्तावना व पाहुण्यांचा परिचय समुपदेशक प्रा. सुनील टकले यांनी करून दिला, तर आभार समुपदेशक प्रा. राजेंद्र वाघ यांनी मानले.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव जरे, पर्यवेक्षक रत्नाकर झिटे, विभागप्रमुख प्रा. रमेश भुजबळ, प्रा. श्रीकांत थोरात, प्रा. बापूराव मांडे, प्रा. संजय फटे, समुपदेशक सौ. उषा बोरुडे, प्रा. संदीप दरेकर तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रोहयो योजना फक्त अधिकारी अन् रोजगार सेवकाच्या खिशात

## वृक्ष लागवडीसह विविध कामात लाखो रुपयांचा भ्रष्टाचार

नांदेड : (समर्थ गांवकरी)

जिल्हा

बिलोली तालुक्यातील ७३ ग्रामपंचायत अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या सार्वजनिक वृक्ष लागवड,वैयक्तिक शेततळे,जाणवरांचा गोठा, सिंचन विहीरीसह विविध योजना फक्त कागदावरच राबविल्या जाते,प्रत्यक्षात मात्र अनेक कामे जाग्यावर उपलब्ध नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. संबंधित अधिकारी व रोजगार सेवकांनी आपल्या मार्जितलेच लाभार्थी घेऊन विविध ठिकाणी बोगस कामे करून शासनाचा निधी हडप केल्याचे बोलल्या जात आहे. रोहयो विभागातील साह्यक कार्यक्रम अधिकारी हे स्थानिकचे रहिवासी असल्यामुळे आपल्या वरिष्ठांना लागेल तेवढा मलिदा चढवून गेल्या अनेक वर्षांपासून बिलोलीत ठांण मारून बसले आहेत. यामुळे तालुक्यातील बहुतांश रोजगार सेवकांना हाताशी धरून तालुक्यातील बोळेगाव, सगरोळी, येसगी, सावळी थडी, हरणाळी, रामतीर्थ, बिजूर, कामरसपल्ली, हिप्पारगा माळ, सह ७३ ग्रामपंचायत अंतर्गत पांदनरस्ते, गावातील सीसी रस्ते, सार्वजनिक वृक्ष लागवड, वैयक्तिक शेततळे, सिंचन विहीर, जनावारांचे गोठे यासारख्या विविध योजनेत मोठी भाग्यदारी ठेऊन काम केल्याचं बोलल्या जात आहे. या योजनेतील सार्वजनिक वृक्ष लागवड, व वैयक्तिक शेततळेसह विविध योजनेची कामे जवळच्या रोजगार सेवकाच्या नातेवाईकात देऊन काही ठीकाणी प्रत्यक्षात तर काही ठिकाणी कागदावरच केली आहे. आणि सदरील कामास लागणारे कामगार फक्त रोजगार सेवकाचे नातेवाईक किंवा मार्जितले घेऊन काम न करताच कामगार हजेरी पुस्तक परस्पर भरवून लाखो रुपयांची बिले हडप केली आहे. यामुळे ही रोहयो योजना शेतकरी व गरजू लाभार्थ्यांची नसून फक्त अधिकारी, रोजगार सेवकांची बनली आहे.



### विहीर चोरीला गेल्याचा प्रकार

काही दिवसाखाली तालुक्यातील बोळेगाव येथील एका शेतकऱ्याची विहीर चोरीस गेल्याची तक्रार झाली. या गावच्या रोजगार सेवकाने शेतकऱ्याच्या शेतात विहीर न खोदता आपल्या नातेवाईकांच्या नावाने हजेरी मस्टर परस्पर भरवून लाखो रुपये उचलले. या बाबत संबंधित शेतकऱ्याला थांगपत्ता लागू दिला नाही. या प्रकारा बाबत अनेक तक्रारी झाल्या पण अधिकाऱ्याच्या निर्लज्ज पणामुळे हे प्रकरण दाबल्या गेलं.

# प्रजासत्ताक दिनाला जोडून सुट्ट्यांमुळे महाराष्ट्र, गोव्यातील बस आरक्षणात वाढ



मुंबई : (समर्थ गांवकरी)

प्रजासत्ताक दिनाच्या लाँग विकेंडमुळे महाराष्ट्र आणि गोव्यातील आंतरशहरी बस प्रवासात लक्षणीय वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. रेडबसकडून उपलब्ध आकडेवारीनुसार, या कालावधीत महाराष्ट्र आणि गोव्यातील बस बुकिंगमध्ये ४६ टक्के वाढ होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. हे विश्लेषण २०२६ मध्ये २३ ते २६ जानेवारी या कालावधीत करण्यात आलेल्या बुकिंग्सची तुलना मागील वर्षीच्या २४ ते २७ जानेवारी २०२५ या कालावधीतील बुकिंग्सशी करून सादर करण्यात आले आहे. या आकडेवारीवरून लाँग विकेंडदरम्यान प्रवासासाठी बस हे माध्यम प्रवाशांच्या प्राधान्यक्रमात कायम असल्याचे स्पष्ट होते.

प्रजासत्ताक दिनाच्या कालावधीत प्रवासाची मागणी वाढत असताना, रेडबसतर्फे ८ ते २६ जानेवारी या कालावधीत 'डिस्कव्हर भारत सेल' सुरू करण्यात आला आहे. या कालावधीत भारतभरातील प्रवासाचे पर्याय २९९ रुपये प्रति सीट या दरापासून उपलब्ध असल्याची माहिती देण्यात आली आहे. या सवलतीच्या कालावधीत बस, रेल्वे आणि हॉटेल बुकिंगवर ५० टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात येत असून, निवडक बँका आणि पेमेंट भागीदारांमार्फत अतिरिक्त बचतीचे पर्यायही उपलब्ध आहेत.

रेडबसच्या व्यासपीठावरील बुकिंगनुसार, गोवा-पुणे, पुणे-हैदराबाद, मुंबई-हैदराबाद, पुणे-नागपूर, पुणे-मुंबई, नागपूर-पुणे आणि मुंबई-पुणे हे मार्ग या कालावधीत अधिक मागणीचे ठरत असल्याचे दिसून येते. तसेच, पुण्यातील वाकड आणि स्वारगेट, गोव्यातील मापुसा आणि आशीर्वाद थिएटर, तसेच मुंबईतील बोरिवली पूर्व ही बसमध्ये चढण्यासाठी प्रमुख ठिकाणे असल्याचे आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. प्रवाशांच्या प्राधान्यक्रमाचा विचार करता, एकूण बुकिंगपैकी ८४ टक्के बुकिंग वातानुकूलित बसेससाठी करण्यात आली आहेत, तर उर्वरित बुकिंग नॉन-एसी बसेससाठी आहेत. यावरून आगाऊ आरक्षण करताना प्रवासी अधिक आरामदायी पर्यायांना पसंती देत असल्याचे स्पष्ट होते. याचप्रमाणे, ८९ टक्के प्रवाशांनी स्लीपर बसचा पर्याय निवडला असून, उर्वरित प्रवाशांनी सीटर सेवा स्वीकारली आहे. सुट्टीच्या काळात रात्रीच्या प्रवासाकडे प्रवाशांचा वाढता कल असल्याचे यातून दिसून येते. प्रवाशांच्या आकडेवारीनुसार, बस बुकिंगमध्ये पुरुष प्रवाशांचे प्रमाण ६८ टक्के असून महिला प्रवाशांचे प्रमाण ३२ टक्के आहे. शहरनिहाय पाहता, प्रथम श्रेणी महानगरांमधून ४८ टक्के प्रवासी प्रवास करत असल्याचे दिसून येते, तर द्वितीय श्रेणी शहरांमधून २२ टक्के आणि तृतीय श्रेणी शहरे तसेच ग्रामीण भागातून ३० टक्के प्रवासी बस प्रवास करत आहेत. यावरून प्रवासाची मागणी अधिक असल्याचे शहरांमधील बाजारपेठही हळूहळू विस्तारत असल्याचे चित्र स्पष्ट होते.

# गणोरे येथील सुगंधाबाई बाळासाहेब आंबरे यांचे दुःखद निधन!

गणोरे : (समर्थ गांवकरी)

गणोरे येथील बाळासाहेब तबाजी आंबरे यांच्या पत्नी कै.सुगंधाबाई बाळासाहेब आंबरे दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजी वयाच्या ६२ व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा तीन मुली, सुना, नातू, पतवंडे व जावई असा मोठा परिवार आहे. बाळासाहेब तबाजी आंबरे याच्या पत्नी व योगेश बाळासाहेब आंबरे यांच्या त्या आई होत. गणोरे येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

त्यांचा दशक्रिया विधी शनिवार दिनांक ३१ जानेवारी २०२६ रोजी आढळा तिरी गणोरे येथे होणार असून, याप्रसंगी ह.भ.प.सुशांत महाराज आरोटे सर यांचे प्रवचन आयोजित करण्यात आले आहे.



कै. सौ. सुगंधाबाई बाळासाहेब आंबरे
स्वर्गवास गुरुवार दि. २२/०१/२०२६

# ड्रग्ज प्रकरणातील आरोपी खा. लंकेंचा कार्यकर्ता? 'त्या' फोटोंनी वाढल्या चर्चा

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

पुणे जिल्ह्यातील शिरुर येथे पकडलेल्या ड्रग्ज प्रकरणाचे धागेदोरे अहिल्यानगरपर्यंत पोहोचले आहेत. गेल्याच आठवड्यात अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेच्या श्यामसुंदर विश्वनाथ गुजर या पोलिस कर्मचाऱ्याला अटक झाली. शिरुर येथील गॅरेजचालक असलेल्या शादाब शेख याच्याकडे सापडलेले ड्रग्ज, हे पारनेर तालुक्यातील कोहोकडी येथील ज्ञानदेव उर्फ माऊली बाळू शिंदे याने दिल्याचे तपासात समोर आले. आता हाच माऊली शिंदे हा खासदार निलेश लंके यांचा कट्टर कार्यकर्ता असल्याच्या चर्चा दबक्या आवाजात सुरु झाल्या आहेत.

माजी डॉं. खा. सुजय विखे पाटील यांनी शुक्रवारी या ड्रग्ज प्रकरणात पोलिसांवर काही गंभीर आरोप केले. ड्रग्ज प्रकरणातील म्होरक्या श्यामसुंदर गुजर हा काही दिवसांपूर्वी पारनेर पोलिस स्टेशनला कार्यरत होता. तेथे त्याच्या कार्यपद्धतीवर गंभीर आरोप झाले होते. अवैध व्यावसायिकांशीही त्याचे संबंध होते. त्याच्याविरोधात तक्रारी झाल्याने त्याची बदली थेट नगर एलसीबी शाखेत करण्यात आली. वास्तविक, गंभीर आरोप असलेल्या पोलिस कर्मचारी एलसीबीत कसा घेतला जातो? असा सवाल डॉं. विखे पाटलांनी उपस्थित केला होता. शिवाय त्याला एलसीबीत घेण्यासाठी कुणाची शिफारस होती? हेही पोलिसांनी पत्रकारांना सांगावे, असे आव्हानही विखे पाटलांनी दिले होते.

आता याच ड्रग्ज प्रकरणातील शिरुर पोलिस ठाण्यात दाखल एफआयआर व्हायरल झाली आहे. त्यात पारनेर तालुक्यातील कोहोकडी, हमावाडी येथील माऊली शिंदेचा सहभाग असल्याचं फिर्यादीत दाखल आहे. याच माऊली शिंदेचे खा. निलेश लंके व त्यांच्या पत्नी राणी लंके यांच्यासोबतचे फोटो आता व्हायरल झाले आहेत. अगदी माऊली शिंदेच्या मुलाच्या वाढदिवसालाही, खा. लंके उपस्थित असल्याचे फोटो व्हायरल झाले आहेत. आरोपी शिंदे यांचे कुटुंब राणी लंके यांच्यासोबतही काही फोटोत दिसत आहे. याच फोटोवरुन आता राजकारण तापले आहे. दोन दिवसांपूर्वी सिस्पे- इन्फिनीटीत आपले नाव जाणिवपूर्वक गोवले गेल्याचे लंके यांनी सांगितले होते. शिवाय पारनेरला बदनाम करण्याचा विरोधकांचा डाव असल्याचेही लंकेंचे म्हणणे होते. परंतु आता पुन्हा एकदा थेट मुख्य आरोपीसोबतचे खा. लंके यांचे फोटो व्हायरल झाल्याने चर्चांना उधाण आले आहे. माऊली शिंदेचे नाव आरोपपत्रात येऊ नये, म्हणून एक नेता अर्धा तास पोलिस ठाण्यात बसलेला होता, असा आरोपही डॉं. सुजय विखेंनी केला होता. त्यामुळे हा नेता कोण? या चर्चांनाही उधाण आले आहे.



खा. लंके यांचे यापूर्वी अनेकदा कुख्यात आरोपींसोबतचे फोटो व्हायरल झाले आहे. अगदी पुण्यातील डॉंन गज्या मारणेचा सत्कारही खा. लंके यांनी स्विकारला होता. सिस्पेचे संचालक हे आपले पाहूणे आहेत, असं वक्तव्यही त्यांनी केलं होतं. त्यानंतर याच पाहुण्यांनी शेकडो कोटींचा घोटाळा केला होता. आता ड्रग्ज प्रकरणातील आरोपीसोबतचे त्यांचे फोटो व्हायरल झाल्याने, खा. लंके पुन्हा चर्चेत आले आहेत. तो मी नव्हेच ही भूमिका घेणाऱ्या खा. लंके यांनी या फोटोबाबत प्रतिक्रीया द्यावी, अशी मागणी सध्या महायुतीच्या कार्यकर्त्यांकडून केली जात आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने सह पत्नीक पत्रकारांचा केला सन्मान .... ग्रामीण पत्रकारांचे सरकारला मोठे योगदान...

# लाडका भाऊ लाडकी बहीण आता लाडका पत्रकार योजना शासनाने सुरू करा : डॉ विश्वास आरोटे









ओतूर : (समर्थ गांवकरी)

जुन्नर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने ओतूर येथील मोनिका सभागृहात बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीचे अवचित्य साधत हा सन्मान सोहळा संपन्न झाला. यावेळी पत्रकारांना पेन,डायरी,मिठाई, घड्याळ, दैनिक गावंकरी दिनदर्शिका, त्याच बरोबर पत्रकारांच्या सुविध पत्नीस साडी देऊन एक एक अनोखा उपक्रम राबविण्यात आला.महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटना ही देणाऱ्यांचा ची संघटना आहे घेणाऱ्यांची नाही. असीही मिश्किल प्रतिक्रिया आरोटे यांनी दिली. पत्रकार संघाचा सामाजिक उपक्रम हा वर्षभर सुरूच असतो. पत्रकार संघ सामाजिक काम करणाऱ्या लोकांचा सन्मान करत असतो. कार्यक्रम प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सचिव डॉ.विश्वासराव आरोटे यांनी उपस्थित पत्रकारांना संबोधित केले. विश्वासराव आरोटे यांच्या माध्यमातून संपूर्ण राज्यातील पत्रकारांना एक संरक्षण देण्याचे काम संघटनेच्या माध्यमातून केले जाते. या कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार दादा रोकडे यांची उपस्थिती लाभली. संघटनेच्या वतीने पश्चिम महाराष्ट्र सचिव संजोग काळदंते यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडले. व्यासपीठावर पत्रकार संघाचे राज्यसचिव डॉ.विश्वासराव आरोटे, संघाचे राज्य पश्चिम महाराष्ट्र संपर्कप्रमुख सुभाष डोके, तसेच पश्चिम महाराष्ट्र सचिव संजोग काळदंते, पत्रकार संघटनेचे जुन्नर तालुका अध्यक्ष भरत अस्वार, दैनिक समर्थ गावंकरी चे व्यवस्थापक संजय फुलसुंदर उपस्थित होते.

या कार्यक्रमाला अशोक डेरे,नयन डुंबरे,राजेश डोके,रवी गजे,शौकत शेख,सुदर्शन मंडले,मनोज तांबे,विकास गडगे,तुषार चिखले,मयूर ढोबळे, फैयाज इनामदार,अनिल डुंबरे,प्रकाश डुंबरे उपस्थित होते.

# विश्व हिंदू परिषद सहमंत्री शंकरजी गायकर यांच्या हस्ते 'दैनिक समर्थ गांवकरी' दिनदर्शिका २०२६चे प्रकाशन!

ब्राम्हणवाडा : (समर्थ गांवकरी)




विश्व हिंदू परिषदचे सहमंत्री मा. शंकरजी गायकर साहेब यांच्या हस्ते दैनिक समर्थ गांवकरी दिनदर्शिका २०२६ चे आज प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी ड. अशोक गायकर, श्री. संपत पाबळे, श्री. भाऊसाहेब गायकर तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे वृत्त संपादक संजय भाऊ गायकर उपस्थित होते.

प्रकाशनावेळी मार्गदर्शन करताना शंकरजी गायकर साहेब यांनी ग्रामीण भागात दैनिक समर्थ गांवकरी वृत्तपत्राचे असलेले महत्त्व अधोरेखित केले. ग्रामीण जनतेचे प्रश्न, शेतकरी, विद्यार्थी, सामाजिक व सांस्कृतिक घडामोडी यांना व्यासपीठ देण्याचे काम हे वृत्तपत्र सातत्याने करत असल्याचे त्यांनी नमूद केले. ग्रामीण पत्रकारितेमुळे समाजप्रबोधन व लोकशाही सुदृढ होण्यास हातभार लागतो, असे मतही त्यांनी व्यक्त केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी दैनिक समर्थ गांवकरीच्या कार्याचा गौरव करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम सौहार्दपूर्ण वातावरणात संपन्न झाला.





# पालघर येथील विजयानंतर माकप आणि किसान सभेच्या ४०,००० शेतकऱ्यांचा भव्य लाँग मार्च नाशिकमधून सुरू

पालघर : (समर्थ गांवकरी)

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली दिनांक २१ जानेवारी रोजी पालघरमध्ये ५०,००० लोकांनी काढलेल्या मोर्चाच्या विजयानंतर, आज २५ जानेवारी रोजी नाशिकमध्ये माकप आणि अखिल भारतीय किसान सभेच्या नेतृत्वाखाली ५५,००० शेतकऱ्यांचा आणखी एक भव्य मोर्चा सुरू झाला.

या मोर्चाचे नेतृत्व माकपचे पॉलिट ब्युरो सदस्य आणि किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक ढवळे, माकपचे माजी केंद्रीय समिती सदस्य आणि किसान सभेचे माजी प्रदेशाध्यक्ष व माजी आमदार जे. पी. गावीत, माकपचे केंद्रीय समिती सदस्य, महाराष्ट्र राज्य सचिव आणि किसान सभेचे राष्ट्रीय सहसचिव डॉ. अजित नवले, माकपचे राज्य सचिवमंडळ सदस्य आणि सीटूचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. डी. एल. कराड, माकपचे राज्य सचिवमंडळ सदस्य आणि नाशिक जिल्हा सचिव इंद्रजित गावीत, माकपचे राज्य समिती सदस्य आणि किसान सभेचे राज्य अध्यक्ष उमेश देशमुख आणि इतर अनेक जण करत आहेत.

पालघरमधील संघर्षाप्रमाणेच नाशिकमधील संघर्षही दोन मुख्य मुद्द्यांवर आधारित आहे.

पहिला मुद्दा वनाधिकार कायदा (FR) आणि पेसा (PES), सिंचन योजना, जिल्हा परिषदेच्या शाळांमधील हजारो रिक्त जागा भरणे इत्यादींबाबत पूर्वी दिलेल्या अनेक आश्वासनांची अंमलबजावणी न करण्याशी संबंधित आहे.

दुसरा मुद्दा भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र आणि राज्य सरकारांच्या कॉर्पोरेटधार्जिण्या धोरणांशी संबंधित आहे, जसे की स्मार्ट मीटर योजना, मनरेगा आणि ग्रामीण रोजगाराला सुरुंग लावणे, सरकार-कॉर्पोरेट युतीद्वारे जमिनींवर कब्जा करणे, चार श्रम संहिता लादणे इत्यादी.

# नवी मुंबई पावणे एमआयडीसी परिसरात भीषण आग; केमिकल कंपनीसह ३ ते ४ कंपन्या जळून खाक, वाहनांचेही मोठे नुकसान!

नवी मुंबई : (समर्थ गांवकरी)






नवी मुंबईतील पावणे एमआयडीसी औद्योगिक परिसरात आज भीषण आगीची घटना घडली. एका केमिकल कंपनीत अचानक लागलेल्या आगीने काही वेळातच उग्र रूप धारण केले. आगीची तीव्रता इतकी मोठी होती की ज्वाळा आणि काळ्या धुराचे लोट दूरवरूनही स्पष्टपणे दिसत होते.

या आगीत संबंधित केमिकल कंपनीसह परिसरातील तीन ते चार कंपन्या पूर्णपणे जळून खाक झाल्या आहेत. प्राथमिक माहितीनुसार या घटनेत कोट्यवधी रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. आगीचा फटका केवळ कंपन्यांपुरताच मर्यादित न राहता परिसरात उभ्या असलेल्या अनेक टू-व्हीलर व रिक्षा देखील आगीच्या भक्ष्यस्थानी सापडल्या.

आगीमुळे आजूबाजूच्या कंपन्यांमधील कच्चा माल, यंत्रसामग्री तसेच तयार मालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अचानक लागलेल्या आगीमुळे परिसरात काम करणाऱ्या कामगारांमध्ये मोठी घबराट पसरली होती.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या अनेक गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. केमिकल पदार्थ असल्यामुळे आग अधिक भडकण्याची शक्यता लक्षात घेऊन अग्निशमन दलाने अत्यंत खबरदारीने आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न सुरू केले. सुरक्षेच्या कारणास्तव परिसरातील काही भाग रिकामा करण्यात आला.

सुदैवाने आतापर्यंत कोणतीही जीवितहानी झाल्याची अधिकृत माहिती नाही, मात्र काही नागरिक व कामगारांना धुराचा त्रास झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. पोलीस प्रशासन, एमआयडीसी अधिकारी तसेच आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा घटनास्थळी तळ ठोकून आहेत.

या आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. शॉर्ट सर्किट किंवा केमिकल रिऍक्शनमुळे आग लागली असण्याची शक्यता वर्तवली जात असून प्रशासनाकडून सखोल तपास सुरू आहे.

वारंवार एमआयडीसी परिसरात अशा प्रकारच्या भीषण आगीच्या घटना घडत असल्यामुळे औद्योगिक सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. सुरक्षा नियमांची काटेकोर अंमलबजावणी होणार का, असा सवाल नागरिक व उद्योग क्षेत्रातून उपस्थित केला जात आहे.

या घटनेमुळे पावणे एमआयडीसी परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

– दैनिक समर्थ गावकरी
मंत्रालय प्रतिनिधी : विष्णु बुरे, नवी मुंबई

# प्रवरा माध्यमिक विद्यालयात मतदार दिन व सुभाष चंद्र बोस यांची जयंती साजरी




पाथर्डी / (समर्थ गांवकरी)

प्रवरा माध्यमिक विद्यालय भुतेटाकळी येथे १६ वा राष्ट्रीय मतदार दिन आणि सुभाष चंद्र बोस यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

दि. २३ शुक्रवार रोजी १६ वा राष्ट्रीय मतदार दिन म्हणून लोकशाही वर निष्ठा ठेवण्याची शपथ विद्यालयात घेण्यात आली. तसेच सुभाष चंद्र बोस यांची जयंती ही मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे उद्योजक श्री जगधने उपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांची भाषणे झाली.

प्रास्ताविक फुंदे बाळासाहेब तर समारोप अशोक भगत यांनी केला. वैष्णवी फुंदे आणि पूजा गिरी या विद्यार्थिनींनी सूत्रसंचालन केले. मुख्याध्यापक पठाण आसिफ यांनी राष्ट्रीय मतदार दिन तसेच सुभाष चंद्र बोस या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर माहिती दिली. उद्योजक श्री जगधने यांनी शाळेच्या चाललेल्या विकास कामावर आपल्या भाषणातून आनंद व्यक्त केला.

याप्रसंगी टाकळकर आजिनाथ, गोडगे बंडोपंत, खुडे लक्ष्मण, खेडकर अशोक, फुंदे वाल्मीक, फुंदे रामकिसन उपस्थित होते.

# वसुंधरा अॅकॅडमी मध्ये माता पालकांसाठी मकर संक्रांती निमित्त 'उत्सव सखी मनाचा' कार्यक्रम उत्साहात संपन्न




अकोले: (समर्थ गांवकरी)

दैनंदिन जबाबदाऱ्यांच्या धावपळीत आपल्या मनातील सखी भाव कुठेतरी हरवतो. तोच सखी भाव उमलावा, हास्याची फुले फुलावित आणि आपुलकीच्या नात्याला नव्याने बहर यावा या उद्देशाने अभिनव शिक्षण संस्था संचालित वसुंधरा अॅकॅडमी मध्ये महिला पालक वर्गासाठी मकर संक्रांती निमित्त हळदी कुंकू या संकल्पनेतून ' उत्सव सखी मनाचा' या आनंद सोहळ्याचे आयोजन केले गेले होते. अभिनव शिक्षण संस्थेच्या कोषाध्यक्ष तसेच वसुंधरा अॅकॅडमीच्या प्राचार्य डॉ. जयश्री देशमुख, उपप्राचार्य राधिका नवले, प्राजक्ता नेटके, शितल तळेकर, माया आहेर, सर्व महिला शिक्षिका, तसेच महिला पालक वर्ग कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन करून करण्यात आली. महिला पालकांसाठी रांगोळी स्पर्धा, उखाणे स्पर्धा व म्युझिकल रिंग अशा विविध मनोरंजक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. सर्व स्पर्धांमध्ये महिला पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपला सहभाग नोंदवला. रांगोळी स्पर्धेत योगिता मिसाळ यांना प्रथम क्रमांकाचे, सुनंदा भागवत यांना द्वितीय क्रमांकाचे तर सुप्रिया शेणकर यांना तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. उखाणे स्पर्धेत योगिता मिसाळ यांना प्रथम क्रमांकाचे, कीर्ती रासने यांना द्वितीय क्रमांकाचे तर शारदा नाईकवाडी यांना तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. म्युझिकल रिंग स्पर्धेत स्मिता मालुंजकर प्रथम क्रमांकाने, कोमल मंडलिक द्वितीय क्रमांकाने तर शितल देशमुख तृतीय क्रमांकाने विजयी झाल्या. सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सर्व महिलांना हळदीकुंकू व ग्रीटिंग कार्ड देऊन सन्मानित करण्यात आले. वसुंधरा अॅकॅडमीच्या शिक्षिकांनी सादर केलेल्या लक्षवेधी नृत्याने कार्यक्रमात रंगत आणली. तसेच शिक्षिका शकुंतला भांगरे व सुरेखा शेटे सुंदर नाटिका सादर केली व सर्वांची मने जिंकली. प्राचार्या डॉ . जयश्री देशमुख यांनी सर्व महिलांना चार चौकटीतून बाहेर येऊन स्वतःला सादर करण्यास प्रेरित केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनिया नवले व शकुंतला भांगरे यांनी केले . कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्या राधिका नवले यांनी केले . शितल तळेकर यांनी सर्वांच्या प्रती ऋण व्यक्त केले. शितल तळेकर, माया आहेर व माधुरी गोसावी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. हा कार्यक्रम महिलांसाठी स्नेह व एकोप्याची भावना निर्माण करणारा आनंदाची पर्वणी व अविस्मरणीय ठरला.

# पालकमंत्री नामदार विखे यांची येणार शेतकरी भेट तातडीने पाणी सोडण्याची मागणी

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

ताजनापूर लिफ्ट टप्पा क्र.०१ च्या योजनेमधील वरूर-आखेगावसह १३ गावांचे बंधारे, शेततळे, गावतलाव भरून मिळण्यासाठी आता पाटबंधारे मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांची १३ गावातील नागरिकांचे शिष्टमंडळ लवकरच भेट घेणार असल्याचे प्रतिपादन शिवसेनेच्या नेत्या सौ.हर्षदा काकडे यांनी येथे केले.

आज दि.१९ रोजी वरूर-आखेगावसह १३ गावातील प्रमुख शेतकऱ्यांची बैठक शेवगाव येथे घेण्यात आली. या बैठकीचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिवसैनिक सकाहारी भापकर होते तर कार्यक्रमास शिवसेनेचे ज्येष्ठ नेते अॅड.शिवाजीराव काकडे, रंगनाथ ढाकणे, महादेव जवरे, लक्ष्मणराव गवळी, बंडूभाऊ बोडखे, तबाजी बोडखे, बाळासाहेब काटे, आबासाहेब बेडके, सोमनाथ तेलोरे, गणेश धावणे, आदिनाथ धावणे, राजेंद्र फलके, गोरक्ष भोसले, डॉ.हेमंत काटे, नामदेव ढाकणे, नवनाथ ढाकणे, राजेंद्र फलके, विश्वास ढाकणे, नवनाथ शिरसाठ, लहू जायभाये, शेषराव टेकाळे, अनिल लांडे, बन्सी बोडखे, मिठू जायभाये, रामनाथ भालेराव, भीमसेन गिरमकर, श्रीरंग हुलजुते, गोरक्ष वावरे, डॉ. अंकुश दराडे, ज्ञानदेव वीर आदी प्रमुख उपस्थितीत होते.

यावेळी पुढे बोलतांना सौ.काकडे म्हणाल्या की, २०१९ पासून या योजनेतून १३ गावांतील बंधारे, गावतलाव, भरून मिळावेत यासाठी आम्ही वेळोवेळी आंदोलने करून ही योजना शासनाकडून मंजूर करून घेतली. आता सदर योजनेचे काम लवकर सुरू व्हावे व त्यावर निधी पडावा यासाठी पाटबंधारे मंत्री महोदय यांची या १३ गावातील शिष्टमंडळ भेट घेणार आहे. या योजनेमुळे या दुष्काळी गावांना न्याय मिळणार असून तेथील जमिनी बागायती होणार आहेत. सतत दुष्काळाच्या छायेत ही गावे आहेत. विधानसभा निवडणुकीमधील अपयशाने आम्ही थोडे थांबलो होतो, परंतु १३ गावातील लोकांनी आम्हाला परत या प्रश्नामध्ये लक्ष घालण्याचा आग्रह केल्यामुळे आज ही बैठक आपण घेत आहोत. हे काम पूर्ण होईपर्यंत सर्वांनी पक्षाचे जोडे बाजूला ठेवून एकीने हा लढा आपल्याला यशस्वी करायचा आहे असेही त्या म्हणाल्या.


यावेळी अॅड.शिवाजीराव काकडे, लहू जायभाये, ज्ञानदेव वीर, मारुती ढाकणे, भाऊसाहेब सातपुते यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक लक्ष्मण गवळी यांनी तर कृष्णा ब्राह्मणे यांनी सर्वांचे आभार मानले.




> ताजनापूरच्या या जललढ्यात आता पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून १३ गावातील महिलाही सहभागी होऊन यासाठी लढा देणार आहोत.
>
> **– मीनाताई डावरे, खरडगाव.**

# गणोरे येथील आहेर वस्ती परिसरात बिबट्याची दहशत; ग्रामस्थ भयभीत!

गणोरे: (समर्थ गांवकरी)



गणोरे येथील छत्रपती शिवाजी विद्यालय परिसरासह रंगनाथ आहेर वस्ती, काळे वस्ती आणि पिंपळगावकडे जाणाऱ्या रस्त्यालगतच्या भागात गेल्या अनेक दिवसांपासून बिबट्याचा मुक्त संचार सुरू असल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. भक्षाच्या शोधात बिबट्याचा या परिसरात कायमस्वरूपी वावर असल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे.

पहाटे सहा वाजण्याच्या सुमारास छत्रपती शिवाजी विद्यालय परिसरात एक तरस आणि बिबट्या रस्ता ओलांडताना सकाळी फिरायला गेलेल्या पादचाऱ्यांच्या निदर्शनास आले. यामुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली. तसेच शनिवारी रात्री सुमारे नऊच्या दरम्यान पिंपळगाव रस्त्यावरील दीपक आहेर यांच्या घरासमोरील गोठ्याजवळ लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात बिबट्या बिनधास्त फिरताना स्पष्टपणे कैद झाला आहे.

याचप्रमाणे बाबा काळे यांच्या नवीन बांधकाम सुरू असलेल्या घराच्या मागील बाजूस असलेल्या ओट्यावर रात्री नऊच्या सुमारास बिबट्या निवांत बसलेला असल्याचेही ग्रामस्थांच्या निदर्शनास आले. वारंवार होत असलेल्या या दर्शनांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये बिबट्याची दहशत अधिकच वाढली आहे.

बिबट्याच्या वाढत्या हालचालींमुळे शेतकरी शेतात जाण्यास घाबरत असून, पिकांना पाणी देणेही अवघड झाले आहे. कोणत्याही क्षणी हल्ला होण्याची भीती असल्याने शेतकरी धास्तावले आहेत. या पार्श्वभूमीवर गणोरे परिसरात तातडीने बिबट्याचा पिंजरा लावावा, अशी जोरदार मागणी स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.



# श्री.क्षेत्र खंडोबा देवस्थान, खळी व श्री.क्षेत्र विठोबा देव मंदिर, धांदरफळ बु. यांना क वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा

## ■ आमदार सत्यजीत तांबे यांच्या पाठपुराव्याला मोठे यश – ग्रामस्थांमध्ये समाधान

**अहिल्यानगरः (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आमदार सत्यजीत तांबे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे संगम नेर तालुक्यातील श्री.क्षेत्र खंडोबा देवस्थान, खळी व श्री. क्षेत्र विठोबा देव मंदिर, धंदारफळ बु. या दोन म हत्त्वाच्या देवस्थानांना शासनाकडून क वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मंजूर करण्यात आला आहे. या निर्णयामुळे तालुका व परिसरातील धार्मिक पर्यटनाला चालना मिळणार आहे. क वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळाल्यानंतर शासनाच्या विविध योजनांतर्गत जिल्हा नियोजन समि तीमार्फत तसेच तीर्थक्षेत्र विकास योजनेतून निधी उपलब्ध होतो. या निधीतून देवस्थान परिसरात भाविकांसाठी स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, अंतर्गत रस्ते, विद्युत व प्रकाश व्यवस्था, सभामंडप, भक्तनिवास, सुशोभीकरण व सुरक्षिततेच्या सुविधा उभारणे शक्य होणार आहे. याची दखल घेऊन क वर्गाच्या तीर्थक्षेत्र दर्जा ला मंजुरी दिल्याबद्दल आमदार सत्यजीत तांबे यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचे विशेष आभार मानले. या निर्णयामुळे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची गैरसोय दूर होणार असून स्थानिक नागरिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच ग्रामविकासाला व स्थानिक अर्थकारणाला सकारात्म क चालना मिळणार आहे. या दोन्ही देवस्थानांना क वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळावा यासाठी सातत्याने पाठपुरावा केल्याबद्दल तालुक्यातील तसेच धांदरफळ गावातील व परिसरातील भाविकांनी तसेच यात्रा कमिटीच्या पदाधिकाऱ्यांनी आम दार सत्यजीत तांबे यांचे आभार मानले आहेत.

लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी संगमनेर तालुक्यातील प्रत्येक गावात महत्त्वपूर्ण योजना राबवल्या.

श्री क्षेत्र खंडोबा आणि श्री क्षेत्र विठोबा धांदरफळ हे संगमनेर तालुक्यातील एक महत्त्वाचे देवस्थानाचे ठिकाण आहे. या तीर्थक्षेत्राला 'क' वर्ग दर्जा मिळाल्यामुळे देवस्थान पर्यटनाला चालना मिळेल.

– आमदार सत्यजीत तांबे

## संगणमेर चे भूमिपुत्र तमाशा कलावंत रघुवीर खेडकर यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर

## पालकमंत्री विखे यांच्याकडून अभिनंदन

**अहील्यानगरः (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्याचे भूमीपुत्र आणि तमाशा कलावंत रघूवीर खेडकर यांचा यंदाच्या पद्म पुरस्काराने झालेला सन्मान महाराष्ट्राच्या ग्रामीण कलेचा गौरव असून,तम ाशा कलेचा नावलौकीक झाला असल्याची प्रतिक्रीया जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केली.

रघूवीर खेडकर यांना पद्म पुरस्कार जाहीर झाल्यानंतर मंत्री राधाकृष्ण विखे यांनी त्यांचे दूरध्वनीवरून अभिनंदन केले. खेडकर परीवाराचे मोठे योगदान तमाशा कलेसाठी आहे.जेष्ठ तमाशा कलावंत स्व.कांताबाई सातारकर यांच्या कडून मिळालेला कलेचा समृध्द वारसा रघूवीर खेडकर यांनी यशस्वीपणे पुढे नेला. आव्हानात्मक परीस्थितीत तमाशा कलेला जिवंत ठेवण्यासाठी सम र्पित भावनेने दिलेल्या योगदानाचा गौरव केंद्र सरकारने पद्म पुरस्कार देवून केल्याचा अभिमान असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

ग्रामीण महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग म्हणून तमाशा कलेकडे पाहीले जाते.अनेक जेष्ठ श्रेष्ठ कलाकारांनी आपल्या त्यागाने महाराष्ट्राच्या कला परंपरेची जोपासना करण्यार्या प्रत्येक कलावंताचा बहुमान या पुरस्काराने झाला असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

सहकार चळवळीचे जनक



पद्मश्री डॉ विठ्ठलरा विखे पाटील यांच्या स्मृती प्रित्यर्थ देण्यात येणारा पहीला राज्यस्तरीय कलागौरव पुरस्कार प्रवरा परीवाराने स्व.कांताबाई सातारकर यांना देवून सन्मानित केल्याची आवर्जून आठवण ना.विखे पाटील यांनी सांगितली.











